N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे **P.S.(ठाणे):** आझादनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0178 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/09/2026 06:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 28/09/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/09/2026
**Time From (वेळेपासून):** 20:22 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/09/2026 **Time (वेळ):** 05:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/09/2026 05:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जय बालाजी झेरक्स दुकान, गांधी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुवर्णा रंगनाथ हांडोरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस निरीक्षक, लाप्रविभाग, ,आझादनगर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस निरीक्षक, लाप्रविभाग, ,आझादनगर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9011010446

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहित बाबासाहेब वारे | | | 1. ग्राम महसुल अधिकारी तलाठी, सजा कुसुंबा, अति कार्यभार कवठ,आझादनगर,धुळे,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्वप्निल रामकष्ण देसले | | | 1. वाडीभोकर ताजिधुळे, आझादनगर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 3 | प्रदीप विश्वास पाटील | | | 1. कवठळ ताजिधुळे,आझादनगर, धुळे,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**



Scanned with OKEN Scanner

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

मी सुवर्णा रंगनाथ हांडोरे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.विभाग, नाशिक
समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.28.09.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना मा.पोलिस अधिक्षक सा ो ला.प्र.विभाग, नाशिक यांनी त्यांचे दालनात बोलावुन कळविले की, तक्रारदार अमोल उर्फ ताउ रमेश बेहेरे, रा. अमळनेर, जि. जळगांव यांचेकडे धु ळे येथील एक लोकसेवक लाचेची मागणी करत आहे. तक्रारदार यांचे संपर्क क्र. 8806733355 असा असुन त्यांवर संपर्क करून त्यांची तक्रार जाणुन घेवुन योग्य ती कार्यवाही करणे बाबत आदेशित केल्याने आम्ही सदर तक्रारदाराशी संपर्क साधला असता त्यांनी, त्यांचेकडे कवठळ गांव धुळे येथील तलाठी मोहित आप्पा हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही मा. जिल्हा उपनिबंधक,सहकार विभाग नाशिक कार्यालयाकडील दोन शासकिय पंच म्हणुन श्री. संजय दत्तात्रय पाटील, वरिष्ठ लिपीक व श्री.अरुण काशिनाथ सानप, कनिष्ठ लिपीक यांना उपलब्ध करुन घेवुन आमची सुवर्णा हांडोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, नाशिक अशी व सापळा पथकाची ओळख करुन देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच तक्रारदार अमोल उर्फ ताउ रमेश बेहेरे हे धुळे येथे भेटणार असले बाबत सांगितले.आम्ही लागलीच सरकारी वाहन क्रमांक एम.एच.15, वाहनाने संपुर्ण साहित्य सामुग्रीसह पंच व सापळा पथक असे लाप्रवि कार्यालय नाशिक येथुन 14:00 वा. रवाना होवुन 17:00 वा. धुळे येथे पोहचलो.
त्यानंतर आम्ही तक्रारदारास संपर्क केला असता तक्रारदार यांनी आंम्हाला संतोषी माता चौक,धुळे येथे येणेबाबत कळविले.त्यानुसार आंम्ही संतोषी माता चौक धुळे येथे तक्रारदार यांना भेटलो.त्यावेळी त्यांना नाव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव अमोल उर्फ ताउ रमेश बेहेरे, वय 38 वर्ष, व्यवसाय व्यापार,बिल्डींग मटेरियल सप्लायर्स रा.ड्रिम सिटी,अंमळनेर,ता.अंमळनेर जि.जळगांव असे सांगुन त्यांना आमची, पंच व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर त्यांनी त्यांचे तक्रारीचीतोंडी हकीगत सांगुन तीत्याच्या स्वहस्ताक्षरात त्यांनी तक्रार लिहुन दिली ती पुढील प्रमाणे

तक्रारदार अमोल उर्फ ताउ रमेश बेहेरे वय 39 वर्ष, व्यवसाय व्यापार,रा. ड्रीम सिटी,अमळनेर ता.अमळनेर जि. जळगांव मो. नं. 8806733355
मी तक्रारी अर्ज देतो की, माझो देव ट्रेडर्स नावाने बिल्डींग मटेरियल सप्लायर्स शॉप असुन माझा मालकीचा एक दहा टायर एम एच 16 ए वाय 1809 अशोक लेलंन्ड कंपनीची व एक बारा टायर चे एम एच 15 एफ व्ही 1899 महिन्द्रा कंपनीची असे दोन गाडया आहेत.सदर गाडयामधुन मी मागणीप्रमाणे रेती व इतर बांधकाम मटेरियल वाहतुक व्यवसाय करीत असतो.

मी सुमारे 1 ते दीड महिन्यापुर्वी कवठळ गांव ता.जि.धुळे येथील पांझरा नदी मधुन रेतीची वाहतुक करुन अमळनेर ता.जि.जळगांव येथे घेवुन जात होतो. त्यावेळी मला कवठळ गावातील प्रदीप पाटील नावाचे इसम भेटले व मला त्यांनी सांगितले की मी तलाठी मोहित वारे याचे खाजगी काम पाहतों तुम्हांला आमचे गावातुन रेती भरायची असेल तर व वाहतुक करायची असेल तर मी तलाठी यांचेशी बोलुन तुमचा गाडया रेती भरुन आमचे गावातुन पास करुन देईल परंतु तुम्हाला तलाठी मोहित आप्पा यांना भेटुन घ्यावा लागेल नाहीतर ते रेती वाहतुक करतांना तुमची गाडी अडवुन तुमच्यावर कारवाई करतील असे सांगितले परंतु मी काही त्यांचे म्हणणे ए कले नाही व मी तलाठी मोहित आप्पा यांना भेटलो नाही.



Scanned with OKEN Scanner

मी दि.25/09/2026 रोजी रात्री मोहाडी फाटा,कवठळ गावाजवळ उभा असतांना प्रदीप पाटील हा पुन्हा मला भेटला व मला म्हणाला की,तलाठी मोहित आप्पा यांचा तुमच्यासाठी निरोप आहे की,त्यांना पांझरा नदी,कवठळ येथुन रेती वाहतुक करायची असेल तर त्यांना प्रत्येक गाडी मागे पंचवीस हजार रुपये दयावे लागतील.तसेच यापुर्वी तुंम्ही दोन गाडया रेती भरुन नेली त्यावेळेस तुंम्ही मोहित आप्पा यांना भेटले नाही त्यामुळे ते तुमचा वाहनावर अवैध गौण खनिज वाहतुकीचा गुन्हा दाखल करणार आहे.तरी तुंम्ही मोहित आप्पा यांना भेटुन त्यांची काय मागणी आहे त्याप्रमाणे त्यांना पैसे देवुन टाका.असे प्रदीप पाटील यांनी मला सांगुन आज दि.28/09/2026 रोजी गांधी पुतळा धुळे येथे तलाठी मोहित आप्पा यांचे भेटीकरता पैसे घेवुन बोलाविले आहे.

मला तलाठी मोहित आप्पा कवठळ ता.जि.धुळे यांना व श्री.प्रदीप पाटील यांना त्यांच्या मागणी प्रमाणे 25000/- रुपये लाच देण्याची अजिबात इच्छा नाही. परंतु मी त्यांना पैसे दिले नाही तर ते माझया वाहनावर विनाकारण कारवाई करतील माझा त्यांचेशी कोणताही आर्थिक व्यवहार अथवा वाद विवाद नाही.

मी आज दि.28.09.2026 रोजी त्यांना भेटण्यास जाणार आहे. तेव्हा त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर आपल्या विभागामार्फत कायदेशीर कारवाई करावी ही विनंती आहे

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तलाठी मोहीत अप्पा व खाजगी ईसम प्रदिप पाटील यांची भेट घेवुनपडताळणी कार्यवाही करावयाची असल्याचे पंचांना सांगुन पडताळणी कार्यवाही बाबत तक्रारदार व दोन्ही पंचांना आवश्यक त्या सविस्तर सुचना दिल्या.

त्यानंतर तक्रारदार यांचेकडेस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन त्यांना संतोषी माता चौक, धुळेयेथुन तलाठी मोहित आप्पा व खाजगी इसम प्रदीप पाटील यांची गांधी पुतळा,धुळे येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार यांची चारचाकी वाहन क्रमांक एम.एच.15 जी आर 8339 ने तक्रारदार बेहेरे व पंच नं. 01 संजय पाटील यांना रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच संजय पाटील असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी संतोषी माता चौक,धुळे येथे खाजगी इसम प्रदीप पाटील यांची मो.सायकल क्रमांक एम एच 18 बी यु 4317 हिने परत आले. तेव्हा पंच नं. 01 संजय पाटील यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, ते व तक्रारदार असे गांधी पुतळा,धुळे येथे खाजगी इसम प्रदीप पाटील व तलाठी मोहित आप्पा वारे यांना भेटण्यासाठी गेलो असता सदर ठिकाणी खाजगी इसम प्रदीप पाटील यांची जय बालाजी झेरॉक्स,गांधी पुतळा येथे भेट झाली. त्यानंतर खाजगी इसम पाटील यांनी तक्रारदार व पंच यांना त्यांचे मोटरसायकल वर बसवुन मंडळ अधिकारी कार्यालय,धुळे येथे घेवुन गेले.सदर ठिकाणी त्यांची तलाठी मोहित वारे यांचेशी भेट झाली.त्यानंतर त्यांनी तेथुन जळगांव कुल्फी गांधी पुतळा येथेघेवुन आले. सदर ठिकाणी तक्रारदार, लोकसेवक मोहित आप्पा वारे व खाजगी इसमयांचेतचर्चा होवुन चर्चे दरम्यान तक्रारदार यांनी मोहित वारे यांना विचारले की,''कसं करायचं मग आपण तुंम्ही सांगा'' त्यावर मोहित वारे यांनी सांगितले की, ''आपलं कसं रेग्युलर चालु ये तीन चार महिन्यापासुन पंचवीस हजार रुपये देवुन टाका.'' त्यानंतर काही वेळाने अमोल बेहेरे यांनी ''किती'' असे बोलले त्यावर मोहित वारे म्हणाले की,''वीस करुन दया''.त्यावेळी खाजगी इसम प्रदीप पाटील यांनी ''त्यांच वीस करुन टाका'' असे बोलले असता मोहित वारे ''हा'' असे बोलुन तक्रारदार यांचे मालकीचे दहा टायर व बारा टायर वाहनाने पांजरा नदी,कवठळ, जि. धुळे येथुन रेती वाहतुक करणेचे मोबदल्याततडजोड अंती 20,000/- रू हजार रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याचे मान्य केल्या बाबतची हकीकत सांगितली.

सदर कथन केलेल्या हकिगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये तलाठी मोहित आप्पा वारे व खाजगी इसम प्रदीप पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडी अंती 20,000/- रुपये लाचेची मागणी केल्याची आमची व पंचांची खात्री झाली.

त्यानंतर तक्रारदार यांनी लाचे कामी लागणारी रक्कम हजर केले. त्यात 500/- रुपये दराच्या 40 नोटा असे 20,000/- रुपये हजर केले. त्यानंतर पोकॉ / सुरेश चव्हाण यांनी सोबत आणलेल्या बॅगेतुन एक ॲन्थ्ा्रॅसिन पावडर चा डबा व एक एल्ट्राव्हायलेट दिवा पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना ॲन्थ्ा्रॅसिन पावडर व एल्ट्राव्हायलेट दिव्याचे गुणधर्मा बाबत सविस्तर सुचना देवुन प्रात्यक्षीक करुन दाखवुन पोकॉ/ सुरेश चव्हाण यांनी सदर लाचेच्या नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवुनदिले. त्यानंतर लोकसेवक मोहित आप्पा वारे व खाजगी इसम प्रदीप पाटील यांनी बोलविले ठिकाणी तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 संजय पाटील अशांना तक्रारदार यांनी खाजगी इसम प्रदीप पाटील यांची आणलेली मो.सायकल क्रमांक एम एच 18 बी यु 4317 ने गांधी पुतळा,धुळे येथे रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2 श्री. अरुण सानप पोहवा संदीप हांडगे व पोकॉ. सुरेश चव्हाण असे सरकारी वाहन क्रमांक एम.एच.15 जे.एस.3186ने रवाना होवुन धुळे शहरातील गांधी पुतळा येथे आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी जय बालाजी झेरॉक्स दुकानाचे समोरील



Scanned with OKEN Scanner

रस्त्यावरुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा आम्ही व सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पंच नं. 01 संजय पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे प्रदीप पाटील व तलाठी मोहित आप्पा वारे यांनी तक्रारदार यांच्याकडुन 20,000/- रुपये लाच स्विकारुन त्यांचे सोबत बसलेला खाजगी इसम स्वप्निल देसले यांचे कडे दिले व ती लाचेची रक्कम स्वप्निल देसले यांनी त्यांचे पॅन्डच्या उजव्या खिशात ठेवले असल्याचे सांगितले. तेव्हा आमचे सुचनेवरुन पोकॉ. सुरेश चव्हाणयांनी स्वप्निल देसले यांना त्यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले. त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पोहवा/संदीप हांडगे यांनी तलाठी मोहित आप्पा वारे यांना त्यांचे दोन्ही हात मनगटापासुन धरुन त्यांना अटकावुन ठेवले. तसेच खाजगी इसम प्रदीप पाटील यांना आम्ही खाली बसण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनेवरून पंच नं. 02 श्री. अरुण सानप यांनी स्वप्निल देसले यांच्या पॅन्डच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर अटकावलेल्या अवस्थेत स्वप्निल देसले, तलाठी मोहित आप्पा वारे व खाजगी इसम प्रदीप पाटील यांना सरकारी वाहनात बसवुन घेवुन तेथुन रवाना होवुन सार्वजनिक बांधकाम विभाग,शासकीय विश्रामगृह,धुळे येथे येवुन तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे दि.28.09.2026 रोजी जय बालाजी झेरॉक्स दुकान, गांधी पुतळा धुळे. येथे आलोसे मोहित बाबासाहेब वारे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा कुसुंबा, अति. कार्यभार कवठळ यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग करूनतक्रारदार यांचे मालकीचे वाहनातुन पांजरा नदी कवठळ गाव, धुळे येथुन रेती वाहतुक करून देणे व त्यावर कारवाई न करण्याचे मोबदल्यात स्वत: करीता तडजोड अंती 20,000/- रू. पंचासमक्ष लाचेची मागणी करून पंचांसमक्ष स्विकारली. आलोसे वारे यांनी स्विकारलेली रक्कम लागलीच त्यांनी खाजगी इसम स्वप्निल रामकृष्ण देसले,राह.वाडीभोकर ता. जि.धुळे यांचेकडे दिली. ती त्याने पंचांसमक्ष् स्वत:च्या ताब्यात घेतली. तसेच खाजगी इसम प्रदीप विश्वास पाटील रा. कवठळ ता.जि.धुळे याने तक्रारदार यांना नमुद कारणासाठी आलोसे वारे यांचे करीता लाच रक्कमेची मागणी करून लाचेची रक्कम देण्यास प्रोत्साहन दिले. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

vinod uttamrao patil(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

पोलीस ठाणे अमलदार
आयाट नगर पो.स्टे.धुळे

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): vinod uttamrao patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with OKEN Scanner